# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date 14 June 2025

## Time 11.00 to 11.05 AM

## Language Marathi

## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

## **प्रादेशिक बातम्या**

## **दिनांक १४ जून २०२५ सकाळी ११.०० वाजता**

****

अहमदाबाद विमान दुर्घटनेतील मृतांची संख्या २५४ वर पोहचली आहे. यात प्रत्यक्ष विमानातील २४२ पैकी २४१ तर, वैद्यकीय महाविद्यालयाच्या ज्या वसतीगृहांवर विमान कोसळलं तिथल्या पाच जणांचाही यात समावेश आहे. यासह या दुर्घनेमुळं जीव गमावावा लागलेल्या नजिकच्या परिसरातील आणखी आठ जणांच्या मृतदेहांची ओळख पटली असून हे मृतदेह त्यांच्या कुटुबियांकडे सुपुर्द करण्यात आले आहेत. विमान प्रवाशांशी संबंधीत २१९ नातेवाईकांचे जणुकीय-डी.एन.ए. नमुने मृतांची ओळख पटवण्यासाठी घेण्यात आल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. दरम्यान, विमान दुर्घटनेच्या मलब्यातून विमानाचा ब्लॅक बॉक्स सापडला असून संबंधित विश्लेषणानंतर याबाबतची सविस्तर माहिती अधिक स्पष्ट होईल.

****

येत्या सोमवारपासून नव्या शैक्षणिक वर्षाला प्रारंभ होत आहे. विदर्भ वगळता राज्यात इतर सर्व विभागांत १६ जूनपासून शाळा सुरू होत आहेत, विदर्भात एका आठवड्यानंतर २३ जूनपासून शाळा सुरू होतील. शाळेची गुणवत्ता वृद्धींगत करण्यासाठी तसंच मुलांची उपस्थिती वाढवण्याकरता शालेय शिक्षण विभागामार्फत राज्यभर 'शाळा प्रवेशोत्सव' उपक्रम साजरा करण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळातल्या सदस्यांसह स्थानिक लोकप्रतिनिधी तसंच अधिकाऱ्यांच्या नजिकच्या शाळेत भेट देण्याचं नियोजन करण्यात आलं आहे. राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी नुकताच या नियोजनाचा आढावा घेतला. शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी आणि शाळांच्या सर्वांगीण विकासासाठी, या भेटीदरम्यान उपाययोजना सूचवाव्यात, असं आवाहन सौनिक यांनी केलं आहे.

****

राज्य परिवहन–एस.टी. महामंडळाने प्रवासी बसगाड्यांच्या राज्यातील हॉटेल–मोटेल थांब्यांबाबत नवी आचारसंहिता जारी केली आहे. महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दोन दिवसापूर्वी पंढरपूर दौऱ्यावर असताना अचानक एस.टी.च्या अधिकृत हॉटेल थांब्याला भेट देऊन प्रवाशांना मिळत असलेल्या सोयी – सुविधांबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली होती.

हॉटेल थांब्या संदर्भात कोणतीही प्रवासी तक्रार उद्धवल्यास संबंधित अधिकाऱ्यांच्या वर जबाबदारी निश्चित करुन कडक कारवाई करण्यात येणार असल्याचं ते म्हणाले. यापुढे नवीन हॉटेल थांब्याला पारदर्शक निविदा प्रक्रियेद्वारे मान्यता देत असताना ती तीन वर्षासाठी दिली जाईल परंतु एक वर्षानंतर संबंधित हॉटेल थांब्यावरील सेवा– सुविधाचा फेर आढावा घेऊन पुढील दोन वर्षीच्या मुदतवाढीबाबत विचार केला जाणार आहे.

हॉटेल थांब्याची शिफारस करताना त्या क्षेत्रातील आगार व्यवस्थापक, विभागीय वाहतूक अधिकारी आणि विभाग नियंत्रक यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करणं अपेक्षित आहे. त्यांच्या वस्तुस्थितीजन्य अहवालाच्या आधारे संबंधित हॉटेल थांब्याला मंजुरी दिली जाईल.

****

पुणे शहरात येणाऱ्या सर्व खासगी प्रवासी बसवर निर्बंध घालण्याचे आदेश पुणे पोलिस आयुक्तांनी दिले आहेत. या पार्श्वभुमीवर ही अन्यायकारक कारवाई असं म्हणत पुणे इथल्या ट्रॅव्हल्स व्यावसायिकांनी खासगी प्रवासी वाहतूक बेमुदत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. पुणे जिल्हा लक्झरी बस असोसिएशन १५ जूनपासून बेमुदत प्रवासी वाहतूक बंद ठेवणार आहे, या निर्णयाला पाठिंबा देत लातूर जिल्हा ट्रॅव्हल्स असोसिएशनंही बंदमध्ये सहभागी होत असल्याचे जाहीर केले आहे.

****

नाशिक इथं २६ ते २८ डिसेंबर २०२५ या कालावधीत विश्व मराठी संमेलन होणार आहे, मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी ही माहिती दिली. नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयात काल झालेल्या आढावा बैठकीनंतर ते बोलत होते. या संमेलनाचे कार्यालय नाशिक इथं १६ ऑगस्ट २०२५ पासून कार्यान्वित होईल.

****

नांदेड जिल्ह्यात वादळी वारं आणि पावसामुळं नुकसान झालेल्या भागांना भेट देण्यासाठी पालकमंत्री अतुल सावे आज जिल्ह्याच्या दौऱ्यावर जाणार आहेत. दुपारी एक वाजता अर्धापूर इथं त्यांचं आगमन होईल. या तालुक्यातील वादळ वाऱ्यानं नुकसानग्रस्त भागांची ते पाहणी करतील.

****

सरस्वती भुवन हायस्कूलचे माजी मुख्याध्यापक, जीवन विकास ग्रंथालयाचे– प्रमुख कार्यवाह तथा महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे प्रमुख कार्यवाह राहिलेले ग्रंथमित्र भास्करराव आर्वीकर यांचे आज १४ जून रोजी पहाटे निधन झाले. ते ८६ वर्षांचे होते. बहुआयामी व्यक्तिमत्व शैक्षणिक, सामाजिक आणि ग्रंथालय चळवळीत ते नेहमी सक्रीय होते. त्यांच्यावर आज दुपारी छत्रपती संभाजीनगर इथं अंत्यसंस्कार होणार आहेत.

****

हवामान - कोकणात बहुतांश ठिकाणी सोसाट्याच्या वाऱ्यांसह तर मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात अनेक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. येत्या १८ आणि १९ तारखेला कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यताही हवामान विभागानं व्यक्त केली आहे. दरम्यान, काल छत्रपती संभाजीनगरसह मराठवाड्यात काही ठिकाणी पावसाच्या सरी कोसळल्या.

****

जागतिक कसोटी क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेत इंग्लंडच्या लंडन इथं लॉर्ड्सवर सुरू असलेल्या अंतिम सामन्यात दक्षिण अफ्रिकेचा संघ अजिंक्यपदाच्या जवळ पोचला आहे. तिसऱ्या दिवसाच्या खेळावर काल दक्षिण अफ्रिकेच्या संघाचं वर्चस्व दिसून आलं. स्पर्धेत अजिंक्य राहाण्यासाठी दक्षिण अफ्रिकेला ६९ धावांची आवश्यकता असून, त्यांचे आठ खेळाडू शिल्लक आहेत.

****